# श्रेष्ठतेचा त्याग करण्याची घोषणा करणारी प्रार्थना

हे पित्या, मी तुझे उपकार मानतो की अद्‌भुत रीतीने माझी घडण झाली आहे, कारण मला घडविणारा तूच आहेस. मी तुझे उपकार मानतो की तू मजवर प्रीती करतोस आणि मला आपला म्हणतोस. येशू ख्रिस्ताचे अनुसरण करण्याच्या अद्‌भुत विशेष अधिकाराबद्दल मी तुझे उपकार मानतो.

वरिष्ठतेची जाणीव बाळगण्याची इच्छा धरल्याबद्दल कृपा करून मला क्षमा कर. मी अशा इच्छांचा त्याग करतो आणि पूर्णपणे त्यांचा अव्हेर करतो. इतरांपेक्षा चांगले असले सहविचार बाळगण्यास मी नकार देतो. मी कबूल करतो की मी इतरांप्रमाणे पातकी आहे, आणि तुझ्यावाचून मी काहीही साध्य करू शकत नाही.

मी वरिष्ठ समूहाचा किंवा पृष्ठभूमीचा आहे या माझ्या समजूतीबद्दल मी पश्चाताप करतो आणि त्या भावनांचा त्याग करतो. मी कबूल करतो की सर्व लोक तुझ्या दृष्टीत समान आहेत.

मी इतरांबद्दल तुच्छतेचे शब्द बोलल्याबद्दल आणि इतरांचा तिरस्कार केल्याबद्दल पश्चाताप करतो, आणि या सर्व शब्दांबद्दल तुझी क्षमा मागतो.

लोकांच्या वंशामुळे, त्यांच्या लिंगभेदामुळे, त्यांच्या संपत्तीमुळे, किंवा त्यांच्या शिक्षणामुळे त्यांना कमी लेखण्याच्या विचाराचा मी नाकार करतो.

मी कबूल करतो की केवळ देवाच्या कृपेने तुझ्या उपस्थितीत उभा राहू शकतो. मानवाच्या न्याय निवडीपासून मी स्वतःला वेगळे करतो, आणि मला वाचवावे म्हणून मी केवळ तुझ्याकडे पाहतो.

मी विशेषेकरून इस्लामच्या या शिकवणीशी नाते तोडण्याची घोषणा करतो धार्मिक लोक श्रेष्ठ आहेत, इस्लाम लोकांस यशस्वी करतो, की मुसलमान मुस्लिमेतर लोकांपेक्षा वरिष्ठ आहेत.

मी या दाव्याचा नाकार आणि त्याग करतो की पुरुष स्त्रियांपेक्षा वरिष्ठ आहेत.

स्वर्गीय पित्या, मी वरिष्ठतेच्या सर्व खोट्या भावनांपासून मागे फिरतो आणि त्याऐवजी तुझी सेवा करण्याची निवड करतो.

प्रभू, मी इतरांच्या यशात आनंदी होण्याची देखील निवड करतो. मी इतरांबद्दल सर्व हेवा आणि मत्सर यांचा नाकार आणि त्याग करतो.

मी तुजमध्ये कोण आहे याबद्दल मला योग्य आणि यथार्थ तारतम्य दे. तू मला कसे पाहतोस याविषयी मला सत्य शिकव. जसा व्यक्ती म्हणून तू मला घडविले आहेस त्याबद्दल संतुष्ट होण्यात माझी मदत कर.